का. न्यायालय.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S. (पोलीस ठाणे):** कवठेमहांकाळ **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0411 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/10/2026 02:37 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 13/10/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 13/10/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:11 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:54 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 14/10/2026 **Time (वेळ):** 01:56 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 14/10/2026 01:56 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 0.5 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** बांधकाम उपविभाग कार्यालय पंचाय,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**



Scanned with OKEN Scanner

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): यास्मीन शरीफ इनामदार

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1985

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो, सांगली, कवठेमहांकाळ, सांगली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, सांगली, कवठेमहांकाळ, सांगली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9527904700



Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष अशोक कांबळे | | | 1. Town/Village (शहर / गाव): गजराज चौक,गल्ली नं 2 शामरावनगर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सांगली शहर,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

वर्दी जबाब दि. 14.10.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं 9527904700.

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.



Scanned with OKEN Scanner

दि. 12/10/2026 रोजी तक्रारदार श्री. दिग्विजय कृष्णदेव देसाई, रा. ढालगाव ता. कवठेमहांकाळ जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची श्री. संतोष अशोक कांबळे, कनिष्ठ अभियंता बांधकाम उपविभाग पंचायत समिती कवठेमहांकाळ यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून त्यांची तक्रार कवठेमहांकाळ येथे येवून घेण्याची विनंती केली. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि. 13.10.2026 रोजी सकाळी 10.30 वाजता पथकासह कवठेमहांकाळ येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असलेचे सुचना दिल्या.

दि.13/10/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना मी मा. उप वनसंरक्षक, प्रादेशिक वनविभाग सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना तात्काळ एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. आम्ही दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 09.25 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/बडणीकर, पोकॉ/नायकुडे, पोकॉ/जाधव व चालक रजपूत असे पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्या सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 09.30 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, माधवनगर, कवलापूर, योगेवाडी, शिरढोण मार्गे महांकाली कारखाना कवठेमहांकाळ येथे सुरक्षित ठिकाणी 10.30 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार देसाई यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. देसाई हे त्यांचेकडील हिरो स्प्लेंडर प्लस क्र. एमएच-10-डीआर-3612 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांना मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. फतरू कासिमसाब मणियार यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.राजेंद्रकुमार रमेश कांबळे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. देसाई यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी कॉन्ट्रॅक्टर म्हणून पंचायत समिती कवठेमहांकाळ मार्फत कुची गावातील रस्त्याचे मुरमीकरण केलेले व मळणगाव या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रास सुविधा पुरविलेबाबत कामाचे मंजूर बिलाचा मोबदला म्हणून 2 टक्के प्रमाणे 17,400/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याचे व लाचेची रक्कम दिल्याशिवाय नवीन काम सुरू करू देणार नसलेबाबतची हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. देसाई यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. त्यावेळी मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करून लोकसेवक श्री. संतोष अशोक कांबळे, कनिष्ठ



Scanned with OKEN Scanner

अभियंता बांधकाम उपविभाग पंचायत समिती कवठेमहांकाळ यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई व पंच क्र.1 मणियार यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी 11.35 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना पडताळणीकामी दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.42 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांची पंचायत समिती कवठेमहांकाळ येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार देसाई व पंच नं.1 मणियार असे तक्रारदार यांचे हिरो स्प्लेंडर प्लस क्र. एमएच-10-डीआर-3612 वरून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. देसाई व पंच नं.1 मणियार असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 12.36 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं.1 मणियार यांना, लोकसेवक संतोष कांबळे, यांची भेट झाली का? तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं.1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार देसाई व मी असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून पंचायत समिती कवठेमहांकाळ येथील पहिल्या मजल्यावरील बांधकाम उप विभाग कार्यालयामध्ये दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक कांबळे यांना फोन करून विचारणा केली असता कांबळे यांनी ते शिरढोण येथे असलेचे सांगून पंधरा मिनीटामध्ये ऑफीसला येत असलेचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे कार्यालयाजवळ लोकसेवक कांबळे यांची येण्याची वाट बघीतली. काही वेळाने लोकसेवक श्री. कांबळे हे कार्यालयामध्ये आलेने तक्रारदार देसाई यांनी त्यांची भेट घेवून त्यांचेशी कामा संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी तक्रारदार देसाई यांनी लोकसेवक कांबळे यांना कुचीच्या कामाबाबत विचारले असता लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना "चौदा राहिलेत आपले द्यायच" असे म्हणून मळणगाव येथील कामाचा मोबदला राहिला असल्याचे सांगितले.

त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना मळणगाव येथील कामचे बिल किती होते असे विचारले असता लोकसेवक कांबळे यांनी "सातच की.....सातदुने चौदा..." असे म्हणून तक्रारदार यांचेकडे मळणगाव येथील कामाचा मोबदला म्हणून 2 टक्के प्रमाणे 14,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "दोन टक्क्याने चौदा हजार" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक कांबळे यांनी "आणी ह्याच... मुरूम टाकुन रोलींग केलता त्याच तर काय विषयच न्हाय... त्याच दिल काय" असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी "हा" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक कांबळे यांनी पैसे दिले नसल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "आता त्या कामाच किती आणी" असे विचारले असता लोकसेवक कांबळे यांनी "ते माझ्यामते किती... दिड का दोन लाखाचा मुरमाचा



Scanned with OKEN Scanner

विषय होता बघा" असे म्हणून कांबळे यांनी तक्रारदार यांना त्यांचेकडील मोबाईलच्या कॅलक्युलेटर वर 17,400/- रूपये असा आकडा टाईप करून तक्रारदार यांना दाखविला. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "सतरा हजार चारशे" असे उच्चारलेवर कांबळे यांनी "ह" असे म्हणून होकार दिला.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना "किती वेळात येवु ?" असे विचारले असता लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना "मी हाय कि दिवसभर.......या कि.... आता मला वाटल कि वेळ काढुनच आलाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "घेवुन येतो कि.... पैसे नाहित आत्ता.... काढुन आणतो.. घेवुन येतो" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक कांबळे यांनी "या कि या.... हाय या" असे म्हणालेने तक्रारदार व मी असे बांधकाम उपविभाग कार्यालय येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार देसाई यांना पडताळणीची हकीकत विचारली असता, तक्रारदार यांनी पंच नं.1 यांचे हकीकतीप्रमाणे मिळतीजुळती हकीकत सांगून लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांनी माझेकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच नं.1 हे आमचेतील बोलणे ऐकू येईल इतक्या अंतरावर हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. देसाई व लोकसेवक श्री.संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांना पंचायत समिती कवठेमहांकाळ यांचे मार्फत तक्रारदार यांनी कुची गावातील रस्त्याचे मुरमीकरण व मळणगाव या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रास सुविधा पुरविले कामाचा मोबदला म्हणून एकुण बिल रक्कमेच्या 2 टक्के प्रमाणे 17,400/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांचेविरूध्द कवठेमहांकाळ पंचायत समिती येथे सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई यांना लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता तक्रारदार यांनी 17,400/- रूपये त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 34 नोटा व 200/- रूपये दराच्या 2 नोटा असे दोन्ही पंचांसमक्ष हजर केल्या.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 17,400/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अंमलदार पोकॉ/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर 17,400/- रूपये नोटांचा बंडल पोकॉ/जाधव यांनी तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये पडताळणी



Scanned with OKEN Scanner

कारवाईवेळचे आरईसी 001 व 002 ह्या फाईल सेव्ह असल्याच्या पंचांना खात्री करून दिली.

त्यानंतर मी 14.57 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार चंद्रकांत जाधव यांना महांकाली कारखाना कवठेमहांकाळ येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोह/बडणीकर यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांचेकडून लाच रक्कम जसीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.11 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांची पंचायत समिती कवठेमहांकाळ येथे भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. देसाई व पंच नं. 1 श्री. मणियार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून

होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. देसाई व पंच नं. 1 श्री. मणियार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 कांबळे व सापळा पथक असे आवश्यकत्या साहित्यासह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ मधून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे महांकाली कारखाना येथे सुटकेससह थांबून राहिले.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे कवठेमहांकाळ गावातून पंचायत समिती कार्यालय कवठेमहांकाळ येथे पार्किगमध्ये दाखल झाले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक असे आमचेकडील वाहनाने तक्रारदार यांचे पासून काही अंतरावर वाहन पार्क केले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे पंचायत समिती कार्यालयामधील पहिल्या मजल्यावरील बांधकाम विभागाचे कार्यालयामध्ये चालत गेलेचे दिसले. लागलीच आम्ही, पंच नं.2 कांबळे व सापळा पथक असे तक्रारदार व पंच नं.1 गेले कार्यालयाचे आजु-बाजुस, जिन्यावर सापळा लावून थांबून राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी बांधकाम विभाग कार्यालयाचे बाहेर येवून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.

लागलीच मी, पंच नं.2 व सापळा पथक असे तक्रारदार यांचेजवळ गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोह/बडणीकर यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.54 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून तक्रारदार यांना बाजूस थांबणेच्या सुचना दिल्या.

त्यावेळी आम्ही तेथे हजर असलेल्या पंच नं.1 मणियार यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम त्यांचेजवळील जेवणाचे डब्याच्या पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांचेजवळील जेवणाचे राखाडी



Scanned with OKEN Scanner

रंगाचे डब्याच्या पिशवीमध्ये ठेवली, त्यावेळी लोकसेवक संतोष कांबळे यांनी लाच रक्कम पिशवीमधून तपासून रक्कम पुन्हा पिशवीमध्ये ठेवून सदरची पिशवी त्यांचे टेबलजवळील खिडकीमध्ये उचलून ठेवली असलेचे सांगितले.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे सापळा पथकाने लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांना ताबेत घेतले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोह/बडणीकर यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे लोकसेवक यांचेजवळील राखाडी रंगाचे जेवणाचे डब्याचे पिशवीची तपासणी केली असता पिशवीमध्ये लाच रक्कमेचा बंडल मिळून आला. त्यानंतर आम्ही दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 कांबळे यांनी सदरची लाच रक्कम ताबेत घेवून सदर नोंटाचे नंबरची तपासणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 कांबळे यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली.

त्यानंतर बांधकाम उपविभाग कार्यालयामध्ये जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांचे हाताची तपासणी केली असता, लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांचे उजवे हातास ठिक-ठिकाणी अँथ्रॉसिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोह/बडणीकर यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या बांधकाम उप विभाग, पंचायत समिती कवठेमहांकाळ येथे पुर्ण केल्या आहेत.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. संतोष कांबळे, कनिष्ठ अभियंता यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. संतोष अशोक कांबळे, वय - 38 वर्षे, व्यवसाय - सहाय्यक अभियंता, श्रेणी-2, बांधकाम उपविभाग पंचायत समिती कवठेमहांकाळ रा. गल्ली नं.2 गजराज कॉलनी शामरावनगर सांगली ता.मिरज जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री. संतोष कांबळे, सहा. अभियंता यांना ताबेत घेवून बांधकाम उपविभाग पंचायत समिती कवठेमहांकाळ येथून रवाना होवून शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. मणियार यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून पंचायत समिती कवठेमहांकाळ येथील पहिल्या मजल्यवरील बांधकाम उपविभाग कार्यालयामध्ये दाखल झालो. त्यावेळी कार्यालयामध्ये लोकसेवक कांबळे हे दिसून आले नसल्याने तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना कांबळे यांचेबाबत विचारणा केली असता ते बाहेर गेले असलेचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना फोन करून विचारणा केली असता कांबळे हे घाटनांद्रे येथे गेले असलेचे व त्यांना येण्यास पाऊण तास लागणार असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे कार्यालयामध्ये लोकसेवक कांबळे यांचे येण्याची वाट बघत बसलो. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक कांबळे हे कार्यालयामध्ये आलेने तक्रारदार व मी असे त्यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक कांबळे व तक्रारदार यांचेमध्ये कुची व मळणगाव येथील कामा संदर्भात चर्चा झाली.

त्यावेळी लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना "दोननच घायलाय तुम्ही... काय तिनन घायलाय"



Scanned with OKEN Scanner

असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी “काय कमी करताय काय न्हाय आता सतरा हजार चारशे व्हायलेत” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना “बर ते क्लिअर करा मागच यायच राहिलेत.... काय चारशे कमी कर” असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवलेली लाच रक्कम उजवे हाताने बाहेर काढून लोकसेवक कांबळे यांचेसमोर धरून “पैसे देवू काय?” असे विचारले असता लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना त्यांचेजवळील राखाडी रंगाचे जेवणाचे डब्याचे पिशवीकडे हाताने इशारा करून लाच रक्कम त्यामध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम लोकसेवक कांबळे यांचेजवळील जेवण्याचे डब्याचे पिशवीमध्ये ठेवून कांबळे यांना “सतरा हजार चारशे...राहिल ना बॅगेत” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक कांबळे यांनी मान डोलावून होकार दिला. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक कांबळे यांचेतील बोलणे झालेनंतर तक्रारदार हे बांधकाम विभाग कार्यालयाचे बाहेर येवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी लोकसेवक संतोष कांबळे यांनी लाच रक्कम पिशवीमधून तपासून रक्कम पुन्हा पिशवीमध्ये ठेवून सदरची पिशवी त्यांचे टेबलजवळील खिडकीमध्ये उचलून ठेवली ” वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. देसाई यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता, तक्रारदार यांनी पंच नं.1 यांचे हकीकतीप्रमाणे मिळतीजुळती हकीकत सांगून लोकसेवक श्री. संतोष कांबळे यांनी लाच रक्कम स्विकारताना पंच नं.1 मणियार हे समक्ष हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कारवाई ही शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 13/10/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. संतोष कांबळे, सहाय्यक अभियंता यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांना पंचायत समिती कवठेमहांकाळ यांचे मार्फत कुची गावातील रस्त्याचे मुरमीकरण व मळणगाव या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रास सुविधा पुरविले कामाचा मोबदला म्हणून एकुण मंजूर बिलाच्या 2 टक्के प्रमाणे 17,400/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच केले सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक श्री. संतोष कांबळे, सहाय्यक अभियंता यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता बांधकाम उपविभाग, पंचायत समिती कवठेमहांकाळ येथे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाच रक्कम 17,400/- रूपये स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी श्री. संतोष अशोक कांबळे, वय - 38 वर्षे, व्यवसाय - सहाय्यक अभियंता, श्रेणी-2, बांधकाम उपविभाग पंचायत समिती कवठेमहांकाळ रा. गल्ली नं.2 गजराज कॉलनी शामरावनगर सांगली ता.मिरज जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

13.



Scanned with OKEN Scanner

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालायरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** pravinkumar devappa kamble (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: PRAVINKUMAR DEVAPPA KAMBLE
Rank: I (Inspector)
Unique No: 92179396026000001
On: 10/14/2026 2:55:59 AM
At PS: KAWATHEMAHANKAL, SANGLI

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** pravinkumar devappaa kamble

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402ssmgm8202y

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with OKEN Scanner

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्म तारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचकः क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिले यास फक्त यातील रकाने यांची नोंद घेतली जाईल)**



Scanned with OKEN Scanner